
# एसपी नवनीत कॉवत साहेब, पोलीस खात्यांची यंत्रणा एकदा स्वच्छ धुऊन काढाच बरं?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



पोलिसांच्या मदतीशिवाय मटका चालवणे शक्यच नसते, हिंमत द्यायची मटका सुरू करायला लावायचा अन् नंतर हप्ते वसूल

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २२७ ■ मंगळवार दि.६ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 227 ■ Tuesday Dt.6 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका चालवणाऱ्यांचे रॅकेट सक्रिय?

## पोलिसांकडून गांजा विकणाऱ्यांवर कारवाई होते, मग मटका चालवणाऱ्यांवर का होत नाही?

- हप्तेखोर पोलीस कर्मचाऱ्यांमुळे अवैध धंदे करणाऱ्यांना प्रोत्साहन?
- तेरी भी चूप, और मेरी भी चूप; आर्थिक तडजोड करणारे पोलीस कर्मचारी कोण?
- पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या कारवाया कौतुकास्पद!
- गुन्हेगारांवर कारवाई करण्यापेक्षा आधी पोलीस यंत्रणेतच स्वच्छता मोहीम राबवणं आवश्यक?

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अवैध धंद्यांने पुन्हा जोर धरला असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार स्वीकारल्यापासून बीड जिल्ह्यातील अवैध धंदे पूर्णपणे बंद झाल्याचे पाहायला मिळाले. परंतु पुन्हा अवैध धंद्यांने डोके वर काढले आहे. शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका चालवणाऱ्यांची रॅकेट सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. या रॅकेटकडे संबंधित पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकातून बोलले जात आहे. शहरात गांजा विकणाऱ्यांवर कारवाई होत आहे. परंतु मटका चालवणाऱ्यांवर का? होत नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मागील दोन दिवसापूर्वी चक्क पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत त्यांच्याच घरात एक पोलीस कर्मचारी गांजा पिताना रंगेहाथ पकडण्यात आले होते. त्या पोलीस कर्मचाऱ्याची जिल्हा रुग्णालयात तपासणी करण्यात आली होती. तपासणी अहवालामध्ये कर्मचाऱ्याने गांजा पिल्याच निष्पन्न झाले. याची गंभीर दखल घेत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात एनडीपीएस क्टनुसार गुन्हा दाखल करून त्या पोलीस कर्मचाऱ्याला निलंबित देखील करण्यात आले आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. तर पोलीस अधीक्षकांसोबत काम करणाऱ्या पोलिसांनाच कायद्याचा धाक नसल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यानुसार पोलिसांकडून गांजा विकणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. परंतु मटका चालवणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाकडून कारवाई केली जात नसल्याने पोलिसांवरील नागरिकांचा विश्वास उडत आहे.




शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका राजरोसपणे सुरू असून, आकडेमोड करणाऱ्या पट्ट्या खुलेआम झळकू लागल्या आहेत. मटक्याच्या पट्ट्या लावून अवैध मटका चालवणाऱ्यांचा रॅकेट सक्रिय झाल्याचे बोलले जात आहे. तर दुसरीकडे शहरातील मटका तसेच सर्वच प्रकारचे अवैध धंदे बंद असल्याचा दावा पोलीस प्रशासनाकडून केला जात आहे. मटका चालवणाऱ्यांकडे संबंधित पोलीस प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची नागरिकातून बोलले जात आहे. यावर पोलीस प्रशासन कारवाई का? करत नाही. याला पोलीस प्रशासनाची पाठबळ आणि आशीर्वाद मिळत आहे. असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे.




सध्या सर्व अवैध धंदे सुरू झाले असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. मात्र अवैध धंदा करणाऱ्यांवर पोलिसांचा धाक बसेना, थातूरमातूर कारवाई करण्याऐवजी कडक कारवाई करण्याची गरज आहे. परंतु पोलिसांकडून तशी कारवाई होताना दिसत नाही. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटक्याचा रॅकेट खुलेआम असताना यांच्यावर पोलीस का कारवाई करत नाही. असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बीड जिल्हा हा मागील काही महिन्यापासून विविध घटनेमुळे चर्चेत आहे. बीड जिल्ह्याची शान उंचावण्यासाठी गुन्हेगारी तसेच अवैध धंदे पूर्णपणे बंद करणे गरजेचे आहे. बीड बदलतय पण यंत्रणा सुधारण्याची गरज, तसेच पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासारख्या अधिकाऱ्यांनी बीडमध्ये केलेल्या कारवाया कौतुकास्पद आहेत. मात्र गुन्हेगारांवर कारवाई करण्यापेक्षा आधी पोलीस यंत्रणेतच स्वच्छता मोहीम राबवणं

पान २ वर

## उद्या देशभरात मोक ड्रिल ची तयारी अंतिम टप्प्यात

बीड । प्रतिनिधी

भारत पाकिस्तानच्या युद्धाच्या तणावपूर्ण वातावरणामुळे भारत सरकारने सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यंत्रणांना व आपत्कालीन विभागांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की भारत देशातील संपूर्ण जिल्ह्यांना उद्या मॉडल ची तयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत जेणेकरून भारत पाकिस्तान युद्ध झाले तर या युद्धाच्या पार्श्वभूमीवर शत्रुदिशांनी आपल्यावर हल्ला केला तर या हल्ल्यातून स्वतःच्या इतर लोकांची काळजी कशी घ्यायची याविषयी मार्गदर्शक तत्वे तयार केलेले आहेत जसे की आपण जर बिल्डिंगमध्ये मोठ्या तिसऱ्या चौथ्या पाचव्या बसल्यावर असाल तर आपत्कालीन सायरन वाढल्यानंतर या बिल्डिंगतून खाली उतरून सुरक्षित ठिकाणी आपण व आपले इतरजनांचे संरक्षण कसे करावे याविषयी ही आपत्कालीन यंत्रणा सर्व जनतेंना जिल्हा वाईस मार्गदर्शन करणार आहेत म्हणून केंद्र सरकारने सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व आपत्कालीन विभागांना तसे स्पष्ट नेते देण्यात आलेले आहेत की संपूर्ण जिल्ह्यात मोठी प्रात्यक्षिके सादर करावे जेणेकरून सर्व जनतेला आपत्काळामध्ये व युद्धाच्या काळामध्ये आपले व इतरजनांचे प्राण कसे बसतील याविषयी सर्व जनताजनार्दनांना विभाग मागील सादर करून प्रात्यक्षिक दाखवणार आहे.

## रस्ता बनला पाण्याचं तळं

### गेवराईत पावसाचे पाणी रस्त्यावर, नागरिकांची गैरसोय!

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील देवगिरी हॉस्पिटलच्या परिसरात पडलेल्या पावसामुळे चक्क रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यासाठी मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. याबाबत नगर परिषद कधी लक्ष देणार ? असा सवाल या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. दवाखाने, मेडीकल, झेरॉक्स दुकान, पतसंस्थेचे कार्यालय, व शिवसेना पक्ष कार्यालय असल्यामुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अन्य छोटी मोठी दुकाने असल्यामुळे या परिसरामध्ये नागरिकांची सतत काही ना काही ना काही कारणास्तव ये जा असते मात्र याच मार्गावरून ये जा करण्यासाठी असलेल्या नालीचे काम नगरपालिकेने अद्याप सुरू न केल्यामुळे पावसात पडलेले पाणी चक्क



रस्त्यांवर साचले आहे. पाण्याला योग्य दिशा मिळण्यासाठी नालीचे काम झालेले नाही. त्यामुळे जवळपास दोन-तीनशे मीटर अंतरात घाण पाणी साचून राहते. या घाणीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. मुख्य रस्ता असून या रस्त्यावर मोठी वाहतूक सतत असते. मुख्य रस्त्याचे रूपांतर सध्या पाण्याच्या मोठ्या तळ्यामध्ये झालेले आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे या भागातील रस्त्यावर प्रचंड पाणी साचले होते रस्त्याच्या कडेला गटारीची सुविधा नसल्यामुळे सदरचे पाणी वाहून जाण्यास कोणतीही जागा नाही जाणीवपूर्वक या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात हे पाप नगरपरिषद व ठेकेदार करत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.

## रखडलेल्या निवडणुकीचा मार्ग झाला मोकळा

पुणे । प्रतिनिधी

कोरोना काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींना लवकरच मुहूर्त लागणार आहे. सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला येत्या चार महिन्यात रखडलेल्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसंच चार आठवड्यांमध्ये निवडणुकीबाबत अधिसूचनाही काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे चार महिन्यात निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे २०२२ मधील ओबीसी राजकीय आरक्षणासह या निवडणुका पार पडणार आहेत. सध्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय कारभार सुरू आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षण किती असावं हे नव्याने निश्चित करण्यात यावं या मागणीसाठी विकास गवळी यांच्याकडून २०१८ मध्ये नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली. २०१९ मध्ये ही याचिका सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली. महाराष्ट्रात ओबीसींचे प्रमाण सध्या लागू असलेल्या २७ टक्के आरक्षणापेक्षा अधिक असल्याने हे आरक्षण वाढवून मिळावे अशी या याचिकेत मागणी होती.

नंदुरबार, गडचिरोली आणि पालघर या तीन आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये ड्ढ, ड्ड आणि जड्ड आरक्षण मिळून पन्नास टक्क्यांच्या

पान २ वर

# शासन आणखी किती जणांचे बळी घेणार?

## खामगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग दुरावस्था; युवा नेते तौफीक पटेल यांचा उद्विग्न सवाल

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातून जात असलेल्या खामगाव–पंढरपूर या राष्ट्रीय महामार्ग धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत अक्षरशः मृत्यूचा सापळा निर्माण झाला आहे. या ठिकाणी जवळपास पाच ते सहा जणांचे नाहक बळी गेले आहेत. तर शेकडो जण गंभीर जखमी झाले आहेत. सरकार आणखी किती जणांचे बळी घेणार आहे, असा उद्विग्न सवाल माजलगाव नगर परिषदेचे माजी सभापती तौफीक पटेल यांनी विचारला आहे.



खामगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग माजलगाव तालुक्यातून जातो. धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत रस्त्याच्या मधोमध मोठमोठ्या भेगा पडलेल्या आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याला तडे गेलेले आहेत. या प्रकारामुळे मागील काही वर्षांत पाच ते सहा जणांचे बळी गेलेले आहेत. यात नामांकित ॲड.घुबडे आणि अभियंता शेजुळ यांचा समावेश होतो. त्याचबरोबर शेकडो दुचाकीस्वार पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झालेली आहे. या रस्त्यावरून शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी दुचाकीवरून ये–जा करतात. मात्र रस्त्याला पडलेल्या मोठमोठ्या भेंगामुळे दुचाकीस्वार अडकून पडल्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. याकडे तौफीक पटेल यांनी शासनाचे लक्ष वेधले. शासन आणखी किती जणांचे बळी घेणार आहेत? असा रास्त सवाल पटेल यांनी व्यक्त केला. धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंतच रस्त्याची एवढी दुरावस्था का झाली? याबद्दल शंकाही तौफीक पटेल यांनी व्यक्त केली. या रस्त्याच्या दुरावस्थेला जे जबाबदार आहेत. त्यांची कसून चौकशी करण्याची मागणीही तौफीक पटेल यांनी लावून धरली आहे. रस्त्याची तातडीने डागडुजी करण्यात यावी, जेणेकरून जनसामान्य लोकांना दिलासा मिळेल शासन आणखी किती जणांचा बळी घेणार आहे? असा उद्विग्न सवाल तौफीक पटेल यांनी विचारला आहे.

'रस्त्याच्या दुरावस्थेप्रश्नी नितीन गडकरींना भेटणार'

खामगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग धारूर रोड, माजलगाव ते लहामेवाडी पर्यंतच्या कामाची तक्रार थेट केंद्रीय व रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे नवी दिल्लीत भेट घेऊन करणार आहे, अशी माहिती माजलगाव नगर परिषदेचे माजी सभापती तौफीक पटेल यांनी दिली. माजलगाव ते लहामेवाडी पर्यंत रस्ता डागडुजीची तातडीने गरज आहे. या मार्गावरील पन्नास गावांचा माजलगावशी थेट संपर्क असतो. अशा ज्वलंत प्रश्नी शासन गाफिल कसे राहू शकते. याकडेही मंत्री गडकरी यांचे लक्ष वेधणार असल्याचेही पटेल यांनी सांगितले.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ७१.५० टक्के गुण संपादन करून मिळविले घवघवीत यश

पात्रुड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी विज्ञान परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये अनुकूल परिस्थितीवर मात करत कु. यादव मंजुळा प्रकाश हिने ७१.५०% मार्क घेऊन घवघवीत यश संपदान केले आहे.

तालुक्यातील माजलगाव तेलगाव हवे लगत सावता नगर पात्रुड येथे रहिवासी असलेल्या गरीब कुटुंबातील परिस्थितीला मात करत कसल्याही प्रकारचे क्लास न लावता बारावी विज्ञान परीक्षेमध्ये ७१.५० टक्के मार्क्स घेऊन घवघवीत यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल तिचे आई–वडील मित्र–मैत्रिणी कॉलेज प्रशासन नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे. वडिल प्रकाश यादव व आई सौ सविता प्रकाश यादव यांची परिस्थिती हालाखीची असताना देखील खचून न जाता दिवस– रात्र कबाड कष्ट मेहनत करून आपल्या पोटाला चिमटा घेत तीनही कन्याला उच्च शिक्षण दिले आणि त्यांचे यशस्वी संगोपन केल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# ढोरवाडी येथे वीज पडून ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेतकरी अभिमान नलबे वय ३५ वर्षे हे शेतात झाडाखाली थांबले असता आज सोमवार रोजी सायंकाळी ६ वा. अचानक आलेल्या अवकाळी पाऊस व वाऱ्यामध्ये त्यांच्या अंगावर वीज पडून ते जागीच मृत्यू मुखी झाल्याची घटना घडलेली आहे. तर याच वेळी साळिंबामध्ये वीज पडून दोन वघारीचा तर कवडगांव मध्ये जनावरांचा गोठा अंगावर पडून एक वघारीचा मृत्यू झाला आहे. आज सकाळी मंडल अधिकारी व तलाठाने घटनास्थळी जाऊन पंचनामा दाखल केला आहे तर मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या वारसांना मंडल अधिकारी फुलचंद खाडे यांनी दहा हजाराची मदत केली आहे.

वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील अभिमान नलबे वय ३५ वर्षे यांना एक एकर शेती असून त्यांना पत्नी, चार मुली व एक मुलगा असा परिवार असून ते मजुरी व शेती करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत असत यामध्ये या कुटुंबावर काळाने घाला घातला असून काल सोमवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास अभिमान नलबे हे अचानक अवकाळी व वादळ वारा व पाऊस आल्याने झाडाखाली थांबलेले होते यामध्ये या झाडाखाली थांबलेल्या नलबे यांच्या अंगावर वीज कोसळल्याने यामध्ये यांचा जागीच मृत्यू झाला आहे तरी अभिमान नलबे यांच्या जाण्याने पत्नी चार मुली व एक मुलगा हे पोरके झाले असून या कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे तरी अभिमान नलबे हे घरातील कमविते व कर्ते असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याने त्यांचे कुटुंब उघड्यावर पडले आहे तरी त्यांना शासनाने व समाजातील दानशूर व्यक्तींनी व सामाजिक संस्था यांनी तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे.तरी या घडलेल्या दुर्दैवी घटनेची हळहळ व्यक्त केली जात आहे. तर याचवेळी तालुक्यातील मौजे साळींबा या ठिकाणी दोन वगारीवर वीज पडून मृत्यू झाला आहे तर कवडगाव या ठिकाणी जनावरांचा गोठा अंगावर पडल्याने एक वगरेचा मृत्यू झाला आहे काल झालेल्या अवकाळी पावसासह वादळात अनेक दगा फटका देखील झाले आहेत तर या घटनांचा महसुली पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी धाव घेतली होती यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या तरुणांच्या वारसांना मंडल अधिकारी फुलचंद खाडे यांनी तब्बल दहा हजार रुपयांची मदत दिली आहे या मदतीचे सर्वत्र कौतुक होत असले तरी मृत्यूमुखी पडलेल्या तरुणांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून...

## शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका चालवणाऱ्यांचे रॅकेट सक्रिय?

आवश्यक गरजेचे आहे. तसेच हप्तेखोर अधिकारी कर्मचाऱ्यांची बदली होणे हे अत्यंत गरजेचे आहे. हप्तेखोर पोलीस कर्मचाऱ्यांमुळे अवैध धंदे करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळत आहे. विशेष म्हणजे शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेले अवैध धंदे करणाऱ्यांकडून आर्थिक तडजोड करणारे पोलीस कर्मचारी कोण? यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे.

सध्या खुलेआम मटका चालवला जात आहे. या मटका चालवणाऱ्याची हिंमत वाढणारे वसूलदारच आहेत. कारण यांच्या मदतीशिवाय हे अवैध धंदे चालवणे शक्यच नसते. हिंमत द्यायची, मटका सुरू करायला लावायचा, नंतर हप्ते वसूल करायचे, अशा प्रकारातून तेरी भी चूप और मेरी भी चूप असा स्थिती पाहायला मिळत आहे. यामुळे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः या प्रकाराकडे लक्ष घालून कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## रखडलेल्या निवडणुकीचा मार्ग झाला मोकळा

पुढे जात होते हे देखील यामध्ये नमूद करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत राज्य सरकारला माहिती देण्याचे आदेश दिल्यावर राज्य सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाने गोळा केलेला डेटा सर्वोच्च न्यायालयात सादर केला. मात्र हा डेटा फेटाळताना ४ मार्च २०२१ ला सर्वोच्च न्यायालयाने जइउ आरक्षणासाठी स्वतंत्र समर्पित आयोग नेमण्याचे आदेश दिले. ११ मार्च २०२२ ला उद्धव ठाकरे सरकारने माजी सचिव जयंतकुमार बांठिया यांच्या नेतृत्वाखाली बांठिया आयोगाची स्थापना केली. मात्र २०२२ च्या जून महिन्यात उद्धव ठाकरे यांचं सरकार पडलं आणि ३० जूनला एकनाथ शिंदे मुख्यमंत्री बनले. बांठिया आयोगाच्या शिफारशी १२ जुलैला सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्या.

मात्र बांठिया आयोगाच्या शिफारशींमुळे ओबीसींच्या जागा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कमी होत होत्या. त्यामुळे अनेक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संथांच्या निवडणुका रखडल्या. राज्यातील ३४ जिल्हा परिषदा, २९ महापालिका, २२ नगरपालिका, ४१ नगरपरिषदा आणि २८९ पंचायत समितीच्या निवडणुका यामुळे रखडल्या. तीन वर्षे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासक राज राहिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा २०२२ च्या आधी ज्या पद्धतीने निवडणुका घेतल्या जात होत्या. त्याच पद्धतीने म्हणजे ओबीसीच्या २७ टक्के आरक्षणासह निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. या सर्वातून काहीच साध्य झालेले नाही. ना जइउ आरक्षण वाढले ना जइउ आरक्षण कमी झाले.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची बालवैज्ञानिक म्हणून निवड

कडा । प्रतिनिधी







येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, महावीर इंग्लिश स्कूल या सी बी एस ई बोर्ड मान्यता प्राप्त शाळेतील शौर्य आंदुरे (इ.८वी), निशिता नहार (इ–९ वी) आणि अक्षरा गांधी (इ –१०वी) या तीन विद्यार्थ्यांची वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (सी एस आय आर) जिज्ञासा. अंतर्गत एक दिवसीय बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

या तीन विद्यार्थ्यांची सी बी एस ई बोर्ड आणि एन सी ई आर टी ने मिळवून प्रथम चाचणी घेण्यात आली आणि त्यानंतर या विद्यार्थ्यांची सी एस आय आर अंतर्गत राष्ट्रीय प्रयोगशाळेत की जिथे भारताच्या पंतप्रधानांनी परवानगी दिलेल्या प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांसोबत या विद्यार्थ्यांना नव – नवीन गोष्टी शिकायला मिळणार आहेत आणि त्याच बरोबर त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळणार आहे. पुणे रिजनल विभागातून फक्त ५० विद्यार्थ्यांची एक दिवसीय बालवैज्ञानिक म्हणून निवड करण्यात आलेली असून त्यामध्ये बीड जिल्ह्यातून फक्त महावीर इंग्लिश स्कूल च्या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री अमितजी राठोड, उपाध्यक्ष श्री. संदिपजी चानोदीया, सचिव श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष श्री डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री. संतोषजी गांधी, मुख्याध्यापक श्री अभिलाष के.के., सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आपले सेवा केंद्राच्या शुल्कात दुप्पट वाढ

## विद्यार्थी, शेतकरी आणि सामान्य नागरिकांवर ताण

पात्रुड । प्रतिनिधी

राज्य शासनाने २५ एप्रिलपासून आपले सरकार सेवा केंद्रांच्या ऑनलाइन शासकीय सेवांच्या शुल्कात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि केंद्रचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे विद्यार्थी, शेतकरी, सामान्य नागरिकांवरही ताण पडणार आहे. त्यामुळे नागरिकांनी निर्णयाला विरोध दर्शविला आहे.

विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांसाठी वाढलेले शुल्क आर्थिक ताण वाढवित आहे. शेतकरी आणि श्रमिक वर्गालाही याक वाढीमुळे अडचणींचा सामना करावा लागणार आहे. केंद्रचालकांनीही वाढी विषयी चिंता व्यक्त केली आहे. सेवा शुल्क वाढल्यामुळे नागरिकांकडून सेवांचा वापर कमी होण्याची शक्यता आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

शासन निर्णयानुसार महसूल विभाग, सामाजिक न्याय विभाग, ग्रामीण विकास विभाग, गृह विभाग आदीच्या एकूण १०२७ सेवा या केंद्रांमार्फत दिल्या जातात. जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, उत्पन्न दाखला, प्रतिज्ञापत्र यांसारख्या अत्यावश्यक सेवांचे दर आता दुपटीने वाढले आहेत. नागरिकांच्या हितासाठी शासनाने या शुल्कवाढीचा पुनर्विचार करावा, अशी मागणी सर्वत्र करण्यात येत आहे. शुल्कात दुप्पट वाढ झाल्यामुळे नागरिक संतप्त झालेत.

# गजानन विद्यालयाचा बारावीचा निकाल ९८.७०%

नवगण राजुरी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छ. संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून नवगण राजुरी येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.७०% एवढा लागला असून यावर्षी पण कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा वाणिज्य शाखेचा निकाल १००%, विज्ञान शाखेचा ९९.८०%, व्यवसाय अभ्यासक्रमाचा ९५.४५% तर कला शाखेचा ९४.२१% एकूण निकाल ९८.७०% इतका लागला असून विज्ञान शाखेतून गुणानुक्रमे प्रथम कु.राऊत ऋतूजा अशोक ९३%, व्दितीय काजळे तेजस्विनी सिताराम ९२.८३%, तृतीय कु.ठेंगल सोनम रामनाथ, कागदे श्रृष्ठी आण्णासाहेब ९२.६७%, कला शाखेतून प्रथम कु. भालेराव प्रतिभा बिभिषण ८४.८३%, द्वितीय कु.सय्यद दिलशाद शौकत ७८.३३%, तृतीय कु.काळे ममता राजू ७३.३३%, वाणिज्य शाखेतून प्रथम चि.गवते नवनाथ दत्तात्रय ८०.३३%, द्वितीय चि.गवते पियुष अनिल ७८.८३%, तृतीय कु.वाघमारे राजश्री अण्णासाहेब ७८.००% गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहायक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, प्रकाश राठोड, गजानन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य भांगे के. आर., सर्व कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# जीन्सच्या जमान्यात पटका धोतर टोपी वापरणारी ही शेवटची पिढी

## आनंदराव नामा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली : सोपान मोरे

शिरूर (का.) । प्रतिनिधी

उखळवाडी गावासह शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांची ओळख ही खमीस धोतर जोडा पटका टोपी या पेहरव्यावर होती तर महिला लुगडे चोळी करट पोलक गवन आंमरेला वापर होत्या ती शेतकऱ्यांची ओळख जीन्सच्या जमान्यात पुसली गेली असून बोटावर मोजण्या इतके लोक हा पेहरावा वापरताना दिसत आहेत तर टोपीचा वापर केवळ कार्यक्रमाच्या आहेरात होत आहे धोतर जोडा पटका टोपी घालणारी व चोळी लुगडे वापरणारे शेवटची पिढी असणार असून दहा वर्षात शेतकरी पेहरावा येणाऱ्या भावी पिढीला चित्रावर पाहावा लागणार हे मात्र नक्की ग्रामीण भागात पूर्वी शेतकरी आरोग्याच्या दृष्टीने लाभदायक असा अंगावर कमीच डोक्याला पटका टोपी पायात चमड्याचा जोडा गळ्यात उपरणे असा रुबाबदार पेहरावा वापरायचे असा रुबाबदार पेहराव शहरातल्या गर्दीत जरी दिसला तरी लोक ओळखायचेच हा शेतकरी आहे असा रुबाब शेतकरी बांधवांचा होता.



बहुतेक शेतकरी पवनी कपड्याचे बनियान किंवा बंडी वापरायचे सुती कपड्याचे तीन गुंडी असलेले खमीज त्यावर घालायचे त्यामुळे अंगातून निघणारा घाम तो कपडा शोषून घेत असायचा बहुतेक शेतकरी डोक्यावर पटका तुरळुक शेतकरी टोपीचा वापर करायचे पटक्यामुळे उन्हापासून बचाव तर व्हायचाच पण कानाचे सुद्धा संरक्षण होत होते त्यामुळे त्यांना बहिरे किंवा कानाचे आजार कधीच जाणवत नव्हते तिन्ही ऋतूत आरोग्याच्या दृष्टीने लाभदायक असे चमड्यांचा जोडा पायात वापरत होते त्यामुळे डोळ्यात जळजळी होणे उन्हाळी लागणे टाचेला भेगा पडणे असे प्रकार होत नव्हते तर महिला हमखास इरकल व चोळीचा वापर करायच्या व पायात चमड्यापासून बनवलेल्या चपला पायात घालत होत्या त्याकाळी शेतकऱ्यांचा पेहराव हा आरोग्याच्या दृष्टीने लाभदायक असल्यामुळे आजारांचे प्रमाणही कमी होते कालांतराने शेती व शेतकरी आधुनिक झाले पणजोबा हाजोबा वडील इथपर्यंत शेतकरी होता तो पुढे शर्ट पॅन्ट वर आला तो पुढे जीन्स वर जाऊन थांबला आहे सद्या ग्रामीण भागात बोटावर मोजणे इतके लोक शेतकरी पेराव्यात दिसत आहेत तर टोपीचा वापर केवळ कार्यक्रमात होताना पाहायला मिळत आहे धोतर जोडा पटका टोपी घालणारी व लुगडे चोळी गवन आंमरेला करट पोलक वापरणारी रुबाबदार शेतकऱ्यांची शेवटची पिढी असणार आहे आणखी दहा वर्षानंतर शेतकरी पेहरावा येणाऱ्या पिढीला चित्रावर पाहावा लागणार हे मात्र नक्की खर आहे. आनंदरावजी नामा भोसले हे काल आमच्यातून निघून गेले आहेत आनंदरावजी भोसले यांनी स्वतःच्या प्रपंचात केलेले योगदान गावासाठी केलेल्या योगदान उखळवाडी गावासाठी बघितलेले स्वप्न व त्यांचे विचार या जुन्या पिढीचे विचार उकळवाडी गाव हे हमेशा या विचारास प्रेरित राहील.

आनंदरावजी भोसले यांना अखेरचा जय महाराष्ट्र व ग्रुप ग्रामपंचायत जाटनांदूर च्या वतीने विद्यमान सरपंच सचिन भाऊ माने यांच्यावतीने शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्या वतीने व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्या वतीने शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो ओम शांती जीन्सच्या जमान्यात पटका धोतर टोपी वापरणारे शेवटची पिढी आपण या पिढीला अखेरचा जय महाराष्ट्र करत आहोत ही पिढी आपल्यातून निघून जात आहे याच पिढीकडून खूप काही शिकण्यासारखे आहे शिकून घ्या जुनी जाणकार माणस आहेत विश्वास खूप दांडगा हिम्मत यांच्यात कुठून कुठून भरलेली जवळ काही नसताना प्रपंच उभे केलेले हीच ती पिढी आहे न घाबरणारे कर्जाला न कंटाळणारी कर्जाला कंटाळून फाशी न घेणारी हीच ती पिढी आहे यांच्याकडून शिकून घ्या=ज=ज हीच ती पिढी शेवटची पिढी परत पाहण्यास भेटणार नाही या पिढीचे इतिहासात नोंद ठेवा पुस्तकांमध्ये धडे लिहा चित्रफीती मध्ये याच पिढीचे चित्र रेखाटा.

# अंथरवन पिंपरी येथील आश्रम शाळेतून १२ वी परीक्षेत मोनिका सिरसाट प्रथम

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ८२.१७ टक्के गुण संपादन करून मिळविले घवघवीत यश!

बीड । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या अंथरवन पिंपरी तांडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेची विद्यार्थिनी मोनिका राजेभाऊ सिरसाट हिने इयत्ता १२ वी (कला शाखा) परीक्षेत ८२.१७ टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन करून माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल तिचे आईवडील, कॉलेज प्रशासन, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र–मैत्रिणींनी अभिनंदन केले आहे.



माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील रहिवासी असणारे अशिक्षित परंतु मोठं कुटुंब या मोठ्या कुटुंबात गरिबी परिस्थिती असतानाही खचून न जाता दिवस–रात्र काबाडकष्ट मेहनत करून आपल्या लाडक्या सात ही कन्यांचे शिक्षण आणि त्यांचे यशस्वी संगोपन, विवाह करणाऱ्या राजाभाऊ सिरसाट आणि त्यांच्या पत्नी सौ. लता सिरसाट या दांम्पत्याने आपल्या सातही मुलींना उच्च शिक्षण दिले. काही मुलींचे विवाह करून त्यांचा सुखाचा संसार सुरू करून दिला. सातव्या क्रमांकाची मुलगी कु. मोनिका हिला विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा होता. परंतु परिस्थितीमुळे तिला विज्ञान शाखेला प्रवेश घेता आला नाही. दरम्यान तिने कला शाखेत प्रवेश घेऊन परिस्थितीवर मात करून हलाकीच्या परिस्थितीत प्रचंड अभ्यास करून परिस्थितीवर मात केली. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेमध्ये मोनिका सिरसाट हिने ८२.१७ टक्के गुण संपादित करून अंथरवन पिंपरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून तिने प्रथम क्रमांक पटकावला.

तिच्या या घवघवीत यशाबद्दल तिचे आईवडील, संस्थेचे संस्थाचालक दिनेश पवार साहेब, प्राचार्य खंदारे सर, प्रा.पवार सर, प्रा.सिरसाट सर, प्रा. आखाडे सर, प्रा. श्रीमती तांबे मॅडम, प्रा.श्रीमती लगसकर मॅडम, सहशिक्षिका श्रीमती कांबळे मॅडम, सहशिक्षिका श्रीमती खंदारे मॅडम यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र–मैत्रिणींनी अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

# हिमोफिलिया रुग्णांसाठी लातूरमध्ये उभारला 'जीवनदायी' उपक्रम

## लातूर येथे हिमोफिलिया रुग्णांसाठी प्रभावी उपक्रम; मोफत फॅक्टर, सेल्फ इन्फ्युजन व फिजिओ थेरेपी कॅम्प चे आयोजन

लातूर | प्रतिनिधी

लातूर येथे हिमोफिलिया या रक्तस्त्रावाशी संबंधित गंभीर आजाराने त्रस्त रुग्णांसाठी लातूर येथे एक अत्यंत दिलासादायक आणि आशादायी उपक्रम राबवण्यात आला. इंटास फाउंडेशन आणि संवेदना संस्थेच्या वतीने, व हेमफिलिया सोसायटी महाराष्ट्र पुणे,जिल्हा समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने डॉ भालचंद्र ब्लड बँक येथील हॉल आवारात मोफत फॅक्टर डिस्ट्रीब्युशन तसेच सेल्फ-इन्फ्यूजन आणि फिजिओथेरपी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून तब्बल ७५ रुग्णांना थेट लाभ झाला असून,१२० फॅक्टर्सचे मोफत वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत सकारात्मक बदल घडून आल्याचे स्पष्टपणे जाणवले.

हिमोफिलिया हा असा विकार आहे, ज्यामध्ये रक्त गोठवण्यासाठी लागणाऱ्या फॅक्टर ८ व फॅक्टर ९ घटकांची कमतरता असते. यामुळे जखम किंवा अंतर्गत रक्तस्त्राव थांबविणे कठीण होते. या आजारावर उपचार म्हणून लागणारी औषधे अत्यंत महागडी असल्याने, ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी उपचार घेणे मोठे आव्हान ठरते. या पार्श्वभूमीवर इंटास फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत हिमोफिलिया रुग्णांसाठी मोफत औषध वितरणाचा निर्णय घेतला, आणि त्या निर्णयाला प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर यशस्वीरित्या मूर्त स्वरूप देण्यात आले.

या शिबिरामध्ये केवळ औषधेच वितरित केली गेली नाहीत, तर रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या उपचार प्रक्रियेत आत्मनिर्भर बनवण्यासाठी सेल्फ-इन्फ्यूजन प्रशिक्षणही देण्यात आले. कांचन सिस्टर यांनी उपस्थित रुग्णांना आणि त्यांच्या पालकांना फॅक्टर स्वतः सेल्फइन्फ्यूजनची योग्य प्रक्रिया, इन्फ्यूजन घेण्याची योग्य पद्धत,



स्वच्छतेची आवश्यक काळजी, तसेच औषधोपचाराच्या वेळा याबाबत सखोल माहिती दिली. फक्त औषधोपचार नव्हे, तर योग्य व्यायाम, दररोजच्या हालचाली, आणि फिजिओथेरपीचे महत्त्व यावरही विशेष भर देण्यात आला. फिजिओथेरपिस्ट डॉ.गायत्री भदकुलवार यांनी रुग्णांसाठी व्यावसायिक मार्गदर्शन केले व हिमोफिलिया रुग्णांसाठी योग्य व्यायाम प्रकार कसे असावेत याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी राजू गायकवाड, जिल्हासमाज कल्याण अधिकारी मा. संतोषकुमार नाईकवाडी, डॉ. गवसाने, डॉ रवींद्र भालेराव, डॉ. भातांब्रे, डॉ राजेश पाटील पारस कोचेटा, डॉ. योगेश नितूरकर, विठ्ठल सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या सर्वांनी रुग्णांशी संवाद साधून त्यांना हिमोफिलिया या आजारावर योग्य उपचार मिळवण्यासाठीचा आत्मविश्वास दिला. कार्यक्रमादरम्यान इंटास फाउंडेशनचे कार्य, त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि समाजासाठी घेतलेला पुढाकार यावरही उपस्थितांनी विशेष भर दिला.

या यशस्वी उपक्रमामध्ये अमित घायाळ (प्रकल्प सहायक, मुंबई), प्रवीणा गेडाम व भक्ती केळगने या इंटास फाउंडेशनच्या टीमनें मोलाची भूमिका बजावली. त्यांचे तळमळीचे काम आणि सातत्यामुळे उपक्रमाला अधिक व्यापक परिणाम मिळाला. याशिवाय डॉ.भालचंद्र ब्लड बँक संवेदना व लातूर मधील समस्थ रुग्णांच्या सक्रिय सहभागामुळे या मदतीसाठी आवश्यक असलेले वैद्यकीय सहकार्यही सहजतेने उपलब्ध झाले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले व इंटास फाउंडेशन तसेच संवेदना प्रकल्प, डॉ भालचंद्र ब्लड बँक यांचे आभार मानले. रुग्णांनी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचेही नमूद केले. हा उपक्रम केवळ औषधोपचारापुरता मर्यादित न राहता, रुग्णांना आत्मनिर्भर बनवण्याचे, त्यांना त्यांच्या आजाराविषयी सजग करण्याचे आणि मानसिक आधार देण्याचे मोठे कार्य करत आहे. इंटास फाउंडेशनच्या या पुढाकारामुळे हिमोफिलिया रुग्णांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण उमटला आहे. या उपक्रमाने समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला असून, भविष्यातही अशी मदत अविरत सुरू राहील, अशी आशा व्यक्त केली आहे.

# स्व.चंद्रकला बाई विष्णुपंत शिंदे यांच्या स्मरणार्थ आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान

धारूर | प्रतिनिधी

येथील जीवन ज्ञानदीप गुरुकुल येथे स्व.चंद्रकला बाई विष्णुपंत शिंदे यांच्या स्मरणार्थ आदर्श विद्यार्थी पुरस्कार प्रदान तसेच दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी चि.विराज ज्ञानेश्वर शिंदे याचा १४ वा वाढदिवस व जीवनदीप गुरुकुल चे प्रा रामकिसन चौरे याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गोड वाटून साजरा करण्यात आला.

किल्ले धारूर शहरातील जीवनदीप ज्ञानदीप गुरुकुल या ठिकाणी दरवर्षी या गुरुकुल मधील जो विद्यार्थी शिक्षण, वर्तनूक, सहकाऱ्या सोबत व्यवस्थित वागणूक, गुरुकुल मधील नियमांचे काटेकोर पणे आवलंब करणाऱ्या विद्यार्थ्यास आदर्श विद्यार्थी म्हणुन घोषित करण्यात येतो त्या प्रमाणे या वर्षी चि.संग्राम बाबारावं खाडे व मुलीतुन कु.जयश्री गोरखराव घुले या विद्यार्थीची निवड करण्यात आली त्यांना आर्थिक



स्वरूपात मानधन, एक स्कूल बॅग, शालेय साहित्य व शालेय उपयोगी वस्तूची किट देण्यात आली व कु.जयश्री चि दहावी बोर्ड चि फिस देखील तिला देण्यात आली.

प्रसंगी कार्यक्रमासाठी आर्य समाजचे जेष्ठ सोमनाथ अप्पा कांबळे, जेष्ठ पत्रकार अनिल महाजन, जीवनदीप ज्ञानदीप चे प्रा.रामकिशन चोरे, जेष्ठ पत्रकार सय्यद शाकेर, शहराध्यक्ष नितीन शिनगारे, पत्रकार अतुल शिनगारे, दिनेश कापसे अंनत भोसले, गणेश सावंत, माजी नगरसेवक रुपेश चिद्रवार, सुरज कोमटवार, ॲड मोहन भोसले, विश्वानंद तोषणीवाल, अशोक मुंडे, सचिन वैष्णव व इतर मान्यवर उपस्थित होते.

रुपेश चिद्रवार यांनी बोलताना सरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उतरून नावीन्य पणा ओळखून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करावी अशी अशा बाळगली, तर अनिल महाजन यांनी सरांन बद्दल गोरद्दगार काढून सरां चे कार्य जेवढ बोलू तेवढं कमी आहे, अखंड आणी अविरत कार्या बद्दल शुभेच्छा दिल्या, विराज ला पुढील उजवलं भविष्या साठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलणं ज्ञानेश्वर शिंदे यांनी तर अभारप्रदर्शन प्रा.रामकिसन चोरे यांनी केले.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना महामानव अभिवादन ग्रुपचे विनम्र अभिवादन

बीड | प्रतिनिधी

रयतेचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १०३ व्या स्मृतिदिनानिमित्त छत्रपती संभाजी क्रीडा संकुलन येथील पुतळ्यास महामानव अभिवादन ग्रुप व शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय, बीड यांच्यातर्फे पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे मार्गदर्शक आयु. डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले, (मेजर समता सैनिक दल, बीड) आयु. प्रशांत वासनिक, एडवोकेट तेजस वडमारे तसेच शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय बीड चे प्रचार्य डॉ. सुवर्णाताई बेंद्रे, उपप्रचार्य श्रीमती शीला मोहिते, आणि इतर प्राध्यापक व विद्यार्थी यांनी राजर्षी रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज यांना स्मृतिदिनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



याप्रसंगी बसपाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वासनिक यांनी रयतेचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून महिलांसाठी व बहुजनांसाठी महाराजांनी दिलेल्या आरक्षणाविषयी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून महिलांना दिलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक स्वातंत्रता याविषयी विस्तृत अशी माहिती दिली. महिला आरक्षणाच्या माध्यमातून देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, श्रीमती द्रोपदी मुर्मु व अनेक मुख्यमंत्री, आयएएस, आयपीएस झालेल्या स्त्रियांनी याचा कशाप्रकारे लाभ घेऊन सत्ता प्रस्थापित केली. याविषयी विस्तृत माहिती दिली. स्त्रियांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा विसर न पडू देता त्यांना सतत स्मरणात ठेवून समता प्रस्थापित करण्यासाठी काम करावे व देशांमध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या विचारसरणीला अमलात आणून देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकांनी काम केले पाहिजे. देशामध्ये जातीयता, विषमता, वर्गवाद, वर्णवाद यापासून अलिप्त राहून देशात शांतता कशी राहील याकरिता तरुणांनी व सर्व नागरिकांनी देशाचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी सर्व जातीधर्माना एकत्रित आनुन देशाच्या हितासाठी झटने कसे गरजेचे आहे हे स्पष्ट केले.

तथागत भगवान बुद्धांचा हा भारत देश समतेचा पुरस्कर्ता आहे. सर्व जाती, धर्मांना, विविधतेंना एकत्रित गुण्या गोविंदाने नांदता येईल यासाठी घटनेनुसार आपले हक्क व कर्तव्याची जान ठेवून वागणे गरजेचे आहे, असा आशावाद व्यक्त करुन महाराजांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

# पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची १२ वी परिक्षेत गगन भरारी यशाची परंपरा कायम

शिरूर कासार | प्रतिनिधी

राज्यात फेब्रुवारी मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची गगन भरारी घेतली असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी निकालाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी गुणवत्ता कायम ठेवून महाविद्यालयाचे नाव रोशन केले आहे. अनुक्रमे निकाल खालील प्रमाणे विज्ञान शाखा १००% वाणिज्य ९६% व कला शाखा ७७.७७% असा निकाल घोषित झाला आहे.

विज्ञान शाखा प्रथम कु. सानप रिया ८९ % द्वितीय कंठाळे सई ८८.५० %तृतीय पवार कार्तिक ८८.३३% वाणिज्य शाखा प्रथम कु.गायकवाड वर्षा ७५% द्वितीय कु. देवगुडे आरती ७२.६७% तृतीय सोनार अभिषेक ७१.६७% तर कला शाखा प्रथम दिगवा गुरुपित ८३.८३% द्वितीय नागरगोजे लिंबराज ८१.१७ % तृतीय कु. सरवदे निशा ७६.५०% आदी विद्यार्थी अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय आले असून विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे यशाची परंपरा कायम ठेवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य अंगदराव दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली बारावी परीक्षा शांततेत व सुरळीतपणे पार पडल्या होत्या. अत्यंत मेहनतीने प्राध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांनी अध्यापन करून यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ. राजीव मचाले, सहप्रशासक योगेश पवार, कार्यवाहक एम ए राऊत, सरपंच गहिनाथ पाखरे, माजी सरपंच रामदास हंगे, उपसरपंच सुभद्राबाई इंगळे, प्रकाश इंगळे, ग्रा.प. सदस्य विनोद कंठाळे, गोरख सानप, नरेश कंठाळे, भगवान पाखरे, किरण चव्हाण, विजय सरवदे, दत्ता इंगळे, नाथा दुधाळ, शेख अलिम, बबन कंठाळे, विष्णू हंगे, बाबासाहेब आवंतकर, आण्णा राऊत, मोहन इंगळे, मच्छिंद्र सानप, समाधान इंगळे, उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोडंगे, माध्यमिक पर्यवेक्षक दिपक रत्नपारखी आदी सह ग्रामस्थांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे बारावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश

धारूर | प्रतिनिधी

धारूर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९८.९५% असून विज्ञान शाखेमध्ये सर्वप्रथम कु. शेळके सायली एकनाथ ८५.६७%, द्वितीय चंदनशिव प्रांजळ किशोर ८५.१७% व तृतीय क्रमांक कु. काळे वेदिका सिद्धेश्वर ८५.००% यांनी प्राप्त केला. वाणिज्य शाखेचा ९४.११ टक्के निकाल आहे. वाणिज्य शाखेतून प्रथम कु. उखंडे शिवकन्या छत्रभुज ७६.५०%, द्वितीय क्रमांक मनेरी करण कृष्णा ७५.८३% तर तृतीय क्रमांक भालेराव ऋतुजा सुखदेव व सुरवसे ओम अण्णासाहेब ७५.१७% या विद्यार्थ्यांनी मिळविला. तर कला शाखेचा ९६.७०% निकाल असून कला शाखेत प्रथम क्रमांक शेख सादिया फारुख ७७.३३%, द्वितीय कु. पारशी साक्षी भीमनाथ ७६.३३% तर तृतीय क्रमांक कु. वाघचौरे मालन चंद्रसेन ७५.६७% यांनी प्राप्त केला.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२५ बारावी बोर्ड परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सचिव आ. सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख सदस्य श्री. जयसिंग सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री. लोभाजी चव्हाण, श्री. अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे, श्री. इं. ना. जाधव यांनी बारावी बोर्ड परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी शैक्षणिक शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली व महाविद्यालयाचे नाव उंचाविले याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात उच्च शिक्षण घ्यावे असे सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. गहिनिनाथ गोयेकर, प्रा. प्रताप भानुसे, प्रा. टी. एन. ढवळे, प्रा. जगदीश शिंदे, प्रा. धनराज सोळंके, प्रा. संदीप गायकवाड, प्रा. विराज देशमुख,प्रा. बुटे, प्रा. राम लोखंडे, प्रा. कोमल सोळंके, प्रा. वैरागे या सर्व प्राध्यापक वर्गाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


# महाराणी ताराबाई उच्च माध्यमिक विद्यालयाची बारावीच्या उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम

## विज्ञान शाखेतून धाईतिडक पायल ८४.८३ % गुण घेऊन तर कला शाखेतून ८३.८३ % हिरे केशव प्रथम

वडवणी | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा इयत्ता १२ वी प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल घोषित झाला असुन संस्कार शिक्षण मंडळ वडवणी, संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १२ वी परीक्षेचा सरासरी निकाल ९७.१७ % लागला असून प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.





याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या बारावी प्रमाणपत्र परीक्षाचा निकाल सोमवार दि.०५ मे २०२५ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. यामध्ये वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नामांकित असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा ९९.३६ % तर कला शाखेचा ९३.४० % तर दोन्ही शाखेंचा एकूण सरासरी ९७.१७ % निकाल लागला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यालयाने उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम ठेवली असून विज्ञान शाखेतून कु.पायल भाऊसाहेब धाईतिडक ८४.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर ८४.३३ % गुण घेऊन कु.प्रतीक्षा महादेव लोंढे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर चि.प्रतीक शिवाजी धाईतिडक यांनी ८३.८३% गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे.

तसेच कला शाखेतून चि.केशव महादेव हिरे यांनी ८३.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर कु.तनुजा बालाजी राऊत हिने ८३.५० % गुण घेऊन द्वितीय क्रमांक आला आहे तर कु.दिव्या नरहरी डोंगरे व चि.ईश्वर बाळू घुगे या दोघांना ७९.३३% समान गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत भैय्या धस, संस्थेचे संचालक इंजि. अशोक भैय्या आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी, उपप्राचार्य मस्के सर, पर्यवेक्षक धाईतिडक सर, श्री.डोईफोडे सर, श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,एचएससी बोर्ड परीक्षेचे परिक्षा विभाग प्रमुख प्रा.कांबळे आर.आर., प्रा.मुंडे सी.व्ही., प्रा.अंडील जी.पी., प्रा.डाके सर,प्रा.केदार सर, प्रा.राठोड सर, प्रा.मुंडे बी.डी., प्राध्यापिका कचरे मॅडम, प्राध्यापिका उघडे मॅडम, सावंत सर यांच्यासह विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# बीड ग्रामीण हद्दीत दुकानासमोर लावलेले टायरची चोरी करणारी टोळी उघड

## दोन आरोपी केले; जेरबंद ६५ हजाराचा मुद्देमाल केला जप्त

बीड । प्रतिनिधी

दि.१५/३/२०२५ रोजी ०६०० ते दि.१६/३/२०२५ रोजीचे ०९३० वा. पुर्वी बीड बायपास रोड लगत शिदोड शिवार ता.जि.बीड येथे फिर्यादी गणेश महादेव गायकवाड व्यवसाय गुत्तेदारी, रा. सुभाष कॉलनी पेठ बीड यांचे गॅरेज लाईन चे गाळया समोर उभे असलेल्या आमचे टाटा कंपनीचे दहा टायरी वाहनाचे आठ टायर्स ९६,०००/- व आठ डिक्स २४०००/- तसेच अखील खान यांचे त्या परिसरात असलेले दुकानासमोर ठेवलेले वेगवेगळया कंपनीचे ०७ टायर १४०००/- रु असे दोन ठिकाणांवरील एकुण १,३४,०००/- रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला म्हणुन दिनांक १७/०३/२०२५ रोजी पो.स्टे. बीड ग्रामीण गुरनं ७९/२०२५ क.३०३(०२) भादंवि प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आली होती.



सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी अधिपत्याखालील पोउपनि महेश विघ्ने यांचे पथकास आरोपी शोध घेवुन गुन्हा उघड कीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले होते. पोउपनि महेश विघ्ने यांनी आपल्या पथकातील अंमलदारसह आरोपीची गोपनिय माहिती काढण्यास सुरुवात केली. दिनांक ०४/०५/२०२५ रोजी आरोपी शोध घेत असतांना गोपनिय माहिती द्वारे कळाले की इसम नामे पापा उर्फ रामेश्वर राजेंद्र शिंदे याने व त्याचे इतर साथीदाराने मिळुन सदर गुन्हा केला आहे. त्यानंतर पथकाने सदर इसमास इंद्रापेढी येथुन ताब्यात घेवुन गुन्हया अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर साथीदार रवी सुंदुर काळे रा.जोगेश्वरी पारधी पेढी, पारा, ता.वाशी, जि.बीड व इतर साथीदारांसह केला असल्याचे कबुली दिली असुन गुन्हयातील गेलामाल पैकी ६४,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

नमुद दोन्ही आरोपीतांना पो.स्टे.बीड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन इतर चार आरोपींचा शोध घेवुन अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे. पुढील तपास पो.स्टे. बीड ग्रामीण हे करीत आहेत. सदरची कामगिरी नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, सचिन पांडकर अपोअ बीड, पो.नि. उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोह/ महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोह/तुषार गायकवाड, पोअं/बप्पासाहेब घोडके, चालक पोह/गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे.

# अपात्र शिक्षक परमेश्वर नेपते यांची बोगस नियुक्ती?

## जिल्हा परिषद शिक्षण विभागकडे तक्रार; चौकशीची मागणी

धारूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीड अंतर्गत किल्ले धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जामदेव वस्ती केंद्र अंजनडोह तालुका धारूर जिल्हा बीड येथील शिक्षक परमेश्वर लिंबाजी नेपते शिक्षक म्हणून कार्यरत आहेत संबंधित शिक्षक कर्मचाऱ्यांनी विषयांकित शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले असून सदरील शासन निर्णयाप्रमाणे शासनापासून माहिती लपून ठेवून संबंधित कर्मचारी शासकीय सेवेचा इतर मिळणाऱ्या शासकीय लाभांचा लाभ घेत आहे संबंधित कर्मचाऱ्यास दि.०८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य झालेले असल्याकारणाने व शासनापासून माहिती लपून ठेवून शासकीय सेवेचा लाभ घेत आहेत संबंधित आपत्याचे जन्म दिनांक पुढील प्रमाणे



निकिता परमेश्वर नेपते यांचा जन्म दि.०२/०४/२००२ तर राहुल परमेश्वर नेपते यांचा जन्म दि.१५/०९/२००५ जन्म अंजली परमेश्वर नेपते यांचा जन्म २५/०७/२००६ असून याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांच्या आपत्याच्या जन्मतारखा आहेत तरी शासन निर्णयानुसार सखोल चौकशी करून शासनाची फसवणूक करणे माहिती लपवून ठेवणे व शासकीय लाभ घेणे या सर्व बाबींचा विचार करता संबंधित कर्मचाऱ्यांचे वर्तन हे जिल्हा परिषद कर्मचारी व दिनांक २८ /०३/ २००५ च्या शासन निर्णयाला हरताळ फासण्याचे काम करत आहे. या अपात्र शिक्षक असलेल्या परमेश्वर नेपते यांची बोगस नियुक्ती असून तात्काळ चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागकडे तक्रार रोहन नखाते यांनी केली असून तरी संबंधित कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी नखाते यांनी केली असून अन्यथा १६/ ०५/ २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालय बीड येथे अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा रोहन नखाते यांनी दिला आहे.

# निकाल लागला परंतु कौतुकाची थाप द्यायला माझे वडील नाहीत - वैभवी देशमुख

मस्साजोग । प्रतिनिधी



आज दुपारी १ वाजता १२ वी एच एससी परीक्षेचा निकाल संपूर्ण महाराष्ट्रात जाहीर झाला. स्व. संतोष देशमुख यांची कन्या हिला या परीक्षेत ८५.३३ % गुण मिळाले आहेत. वैभवी प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना म्हणाली माझ्या बाबांच्या प्रकारणाला चार महिने उलटले तरीही अद्याप एक आरोपी फरार आहे. तो पोलीसांना सापडत नाही, माझ्या वडिलांच्या खून प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे पुढे बोलताना म्हणाली.

आज बारावीचा निकाल लागला मला ८५.३३% गुण मिळाले आहेत. परंतु माझ्या पाठीवर कौतुकाची थाप द्यायला माझे वडील नाहीत. माझी नीट ची परीक्षा देखील दिली आहे परंतु काल झालेला नीट चा पेपर मला अवघड गेलेला आहे. त्याच्यात स्कोरिंग कमी येत आहे. परंतु मी माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करणार आहे.माझ्या वडिलांचा अतिशय निर्घुणपणे खून करण्यात आला होता, त्या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी तसेच एक आरोपी अद्यापही फरार आहेत त्याला देखील अटक केली जावे अशी मागणी वैभवी देशमुख हिने केली.

# भीषण पाणी टंचाई संदर्भात बीड नगर परिषदेच्या विरोधात शुक्रवारी हंडा मोर्चा : शेख निजाम, भागवत तावरे

बीड । प्रतिनिधी

सध्या तीव्र उन्हाळ्यामुळे उन्हाची तीव्रता वाढली असुन बीड शहर व परिसरात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी बिंदुसरा धरण व माजलगाव बॅक वॉटर योजनेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा केला जातो परंतु माजलगाव बॅक वॉटर योजनेतील काडी वडगाव येथे पाईपलाईन फुटल्यामुळे व इतर तांत्रिक अडचणीमुळे बीड शहराला होणारा पाणीपुरवठा मागील एक महिन्यापासून खंडित आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वन वन फिरावे लागत आहे. लोकांना पाण्यासाठी अतिरिक्त पैसे मोजून टँकर द्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक अत्यंत परेशान झालेला आहे.

बीड मतदार संघाचे लोकप्रतिनिधी फक्त पाणी टंचाई संदर्भातील समस्ये कडे कोणतीही ठोस उपाययोजना न करता



सोशल मीडिया व वर्तमानपत्राद्वारे आपले फोटो छापून आणण्याची हौस पूर्ण करीत आहेत. या व्यतिरिक्त त्यांचे कोणतेही वैधानिक काम या संदर्भात केलेले दिसत नाही. मागील ५० वर्षापासून बीड शहरावर ठराविक कुटुंबाची सत्ता आहे व त्यांनी आपल्या सत्तेच्या कालखंडात बीड शहरातील कोणत्याही समस्या सोडविल्या नाहीत. त्या समस्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत त्या अद्याप पर्यंत पूर्ण केलेल्या नाहीत किंवा त्यांची तशी मानसिकता व योग्य दिशा त्यांच्याकडून दिसत नाही. बीड नगर परिषदेची प्रशासन संपूर्णतः कोलमडले असून शहरातील नागरिकांना स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत पथदिवे व इतर पायाभूत सुविधा साठी झगडावे लागत आहे. ज्यांना निवडून दिले ते फक्त आम्हीच किती कर्तुत्ववान आहोत असा भ्रम लोकांमध्ये निर्माण करून स्वतःचे गुणगान गात आहेत. हे आम्हीच केले, कोर्टात आमुक केलं, तमुक केलं यांतच ते मग्न आहेत. सर्व सामान्य जनतेच्या पायाभूत सुविधांवर यांना काहीच घेणे देणे नाही.

या सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेवर शुक्रवार दिनांक ९ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासून बीड नगर परिषद कार्यालय भव्य हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम, लोकपत्रकार भागवत तावरे, शेख अमर, खय्युम इनामदार, शेख खदीर, शेख जाकीर, सय्यद आजम, पठाण आयुब, मोमीन जुबेर आदींनी केले आहे.

# तब्बल १९ वर्षानंतर २००५ - २००६ बॅचची सिरसमार्ग येथे शाळा भरली



बीड । प्रतिनिधी

आज प्रथमच समर्थ विद्यालय शिरासमार्ग या ठिकाणी इयत्ता १० वी गेट-टुगेदर चा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाला, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक मा.श्री मोहनराव पवळ सर तसेच संस्थेचे विद्यमान मुख्याध्यापक तथा संस्थेचे सचिव मा.श्री सुभाष दादा पवळ सर हे होते.

या कार्यक्रमाची शोभा ज्यांच्यामुळे वाढली असे प्रमुख अतिथी गुरुवर्य श्री जमदाडे सर, श्री गिरी सर, श्री सूत्रे सर, श्री सुपेकर सर, श्रीमती सुपेकर मॅडम, श्री मगर सर, श्री तांबारे सर, श्री भगवान वखारे, श्री चंदनराव पंडित उपस्थित होते. तसेच त्यांनी सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले, आणि सर्व इयत्ता दहावीचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री ज्ञानेश्वर भास्कळ यांनी केले तसेच नरेंद्र हजारे आणि उद्धव वखरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन किशोर केसकर यांनी मानले.

# बीडच्या जनतेला स्वच्छ, निरोगी, निर्जंतुक पाणी द्या : नितीन जायभाये

## जनतेच्या आरोग्याशी खेळू नका, स्वच्छ पाण्यासारखा पारदर्शक कारभार पाहिजे

बीड । प्रतिनिधी

फिल्टर प्लांट पासून ४० किलोमीटर अंतरापर्यंत पाईपलाईनचा वॉश आऊट घेण्याआधी रमजान ईद- गुढीपाडवा आणि तत्सम सणांच्या काळात आधी आणि नंतर त्याच पाईपलाईन मधून बीड शहरातील जनतेला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा चालू होता. गेल्या कित्येक दिवसांपासून त्याच पाईपलाईन मधून आलेले पिण्याचे पाणी बीड शहरातील जनतेच्या घराघरांमध्ये भरून ठेवण्यात आलेले आहे व काटकसरीने वापरात आहे. ते पाणी स्वच्छ, निरोगी, निर्जंतुक-शुद्ध पिण्यास योग्य आहे का नाही ते नगरपालिकेने व प्रशासनाने खुलासा करून सांगावे ही बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रशासनाला जनहितार्थ मागणी करण्यात येत आहे.



उष्णतेच्या या लाटेमध्ये अशुद्ध पाणी पिण्यामुळे घरोघर लोक आजारी पडत आहेत साथीच्या रोगांचे बळी पडत आहेत. याची जिम्मेदारी कोणाची ? दुरुस्तीच्या कामांच्या ठिकाणी व तुमच्या फिल्टर प्लांट च्या ठिकाणी व परिसरात पाईपलाईन मध्ये उंदीर,घूसी, मांजरं मुंगूस, साप, कुत्र्यांची पिले-कुत्रे इतर काही उपद्रवी प्राणी घुसू नयेत यासाठी काय उपयोजना केल्या आहेत? व याची जिम्मेदारी कोणाची याचाही प्रशासनाने खुलासा करावा. स्वच्छ शुद्ध निर्जंतुक, निरोगी पाणी जनतेला पिण्यास पुरवण्याची जिम्मेदारी ही नगरपालिकेची व प्रशासनाची आहे. शुद्ध पिण्याच्या पाण्यावर जनतेचा अधिकार आहे.

जनतेच्या हक्काचे पाणी जनतेला वेळेवर मिळायलाच पाहिजे. उन्हाळ्यात- पावसाळ्यात येणाऱ्या नैसर्गिक संकटातून जनतेला वाचवण्यासाठी बीड नगरपालिका कधीही पूर्वतयारी करत नाही. संबंधित नेते पुढारीही याबाबतीत कधी विचार करत नाहीत. तत्सम काही नेते पुढारी व आमदार तहान लागल्यावर आड शोधायला व खांदायला निघालेले आपल्याला नेहमीच दिसतात. नैसर्गिक आपत्तींच्या आधी पूर्वतयारी म्हणून काही करताना व आवश्यकत्या योजना राबवताना हे कधी कुठेही दिसत नाहीत. ठोस, पारदर्शक व दूरदृष्टी असलेला कारभार राबवताना, जनतेच्या पैशावर मौज मज्जा मारणारे प्रशासन, अधिकारी, नेते -पुढारी,आमदार-खासदार हे नेहमीच अपयशी झालेले आपल्याला दिसत आहेत.

बीड शहरालगत अनेक दिवसांपासून पाईपलाईन दुरुस्तीचे काम चालू आहे. या दुरुस्ती दरम्यान पाईपलाईन मध्ये मेलेली कुत्रे मिळून आली, लाखो लिटर पाणी व पाईपलाईन वॉश आऊट साठी साठी नदीमध्ये सोडण्यात आले अशी माहिती परिसरातील काही नागरिकांनी फोन द्वारे कळवली होती. यामुळे जनतेच्या मनामध्ये शंका कुशंका व संभ्रम निर्माण झाला आहे. हा जीवनावश्यक पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील प्रश्न आहे. या प्रश्नावर सर्वसामान्य जनता म्हणून आम्ही अति संवेदनशील आहोत. हा आमचा व आमच्या कुटुंबांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. नक्की काय प्रकार आहे याचा खुलासा नगरपालिकेने व प्रशासनाने करावा अशी बीड शहर बचाव मंचच्या वतीने जनहितार्थ मागणी करण्यात येत आहे.

# सौ. सीमाताई ओस्तवाल यांचं कार्य कौतुकास्पद

## ध्येयाने प्रेरीत होऊन काम करणारी माणसे समाजात आदर्श निर्माण करतात : विजयराज बंब

## पदमपाणी पुरस्काराचे थाटात वितरण; विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव

बीड । प्रतिनिधी

ध्येयाने प्रेरित होऊन काम करणारी माणसे समाजात आदर्श निर्माण करतात, पदमपाणी संस्थेने सातत्याने सत्तरा वर्ष समाजातील चांगल्या हिऱ्यांची पारख करुन, त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्याची परंपरा टिकवून ठेवली, ही गोष्ट कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन दै. लोकाशाचे संपादक विजयराज बंब यांनी केले. पदमपाणी पुरस्कार वितरण सोहळयात अध्यक्षीय भाषणात विजयराज बंब यांनी पद्मपाणिचे दिलीप तरकसे यांच्या कार्याची प्रशंसा करीत, ज्यांना पुरस्कार मिळाले त्यांचा हातून यापुढे चांगले काम व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली. रविवार दिनांक ४ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पद्मपाणि पुरस्काराचे थाटात वितरण करण्यात आले.

पद्मपाणि पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, साहित्यीक विठ्ठल जाधव, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक सुभाष सानप, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, बाबासाहेब उजगरे, मैना बोराडे, उत्तमराव पवार, ॲड. राख, खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य गौतम गायकवाड, मुख्याध्यापक गणेश वाघ, समाजकल्याणच्या कविता गायकवाड, सुभाष क्षीरसागर, राजेश तांगडे, प्राचार्य देविदास निकाळजे, विजयकुमार इंगळे, अस्मिता जावळे, किरण ससाणे, बाळासाहेब वाघमारे, विष्णु वाघमारे, आदर्श तरकसे, संदेश तरकसे, नवनाथ पोटभरे, सीमा ओस्तवाल, तृप्ती बंब कोठारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.



### यांचा झाला गौरव

दै. लोकाशाचे निवासी संपादक उत्तम हजारे, दै. रिपोर्टर बीडचे कार्यकारी संपादक - गणेश सावंत दै. पुढारी न्यूजचे बीड जिल्हा प्रतिनिधी- उदय नागरगोजे, नायरा राज मुळे, अमोल मुळे, नितेश उपाध्ये, शाहिरा जाधव, सौ डॉ सीमा ओस्तवाल, राजू वंजारे, अभिजित वैद्य, माधवराव नरसिंहराव पात्रे, आम्रपाली (स्नेहा) साबळे, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी पुरस्कार बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपशिक्षणाधिकारी अधिकारी मैना बोराडे मॅडम. वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे एअरपोर्ट संभाजीनगरचे -पंकज आढाव, उत्कृष्ट अधिकारी बीड राजेंद्र ओव्हाळ, प्राचार्य सुधीर देशमुख, भागवत सावंत (उपळी हायस्कूल, उपळी), अनिता काळे (संस्कार विद्यालय बीड), रामराव विठ्ठल मोरे, प्रा शशिकांत जावळे, वर्षा हिंगसे, देविदास हिरे, शेख राजू शेख नूर, रामचंद्र कसबे, आदर्श शिक्षक पुरस्कार राहुल निकाळजे, आजिनाथ गहिनीनाथ सुळे, गौतम गायकवाड, पद्मपाणि राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार-अमोल जगताप ( आवरगाव ग्रामपंचायत कार्यालय आवरगाव तालुका धारूर).

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप तरकसे यांनी केले. यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, सुभाष सानप, विठ्ठल जाधव, सीमा ओस्तवाल यांची भाषणे झाली. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की, समाजाच्या जडणघडणीत नागरिक म्हणून सर्वांची जबाबदारी आहे. पद्मपाणिने पुरस्कारासाठी निवडलेले विविध क्षेत्रातील मान्यवर कौतुकास पात्र आहेत. यावेळी पुढे बोलताना, संपादक विजयराज बंब म्हणाले की, हा सोहळा मला एका प्रसंगाची आठवण करून देतो. काही वर्षांपूर्वी पहलगाम, काश्मीर येथे मी एका सामाजिक शिबिरासाठी गेलो होतो. तिथे एका जवानाची भेट झाली. त्या काळात तिथे झालेल्या एका दहशतवादी हल्ल्यात त्याच्या सहकाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता अनेकांना वाचवलं होत. मी त्याला विचारलं, इतका धोका, इतकी अनिश्चितताः काय देतं तुला बळ? तो म्हणाला, सर, देशसेवा हीच खरी प्रेरणा, लोकांना वाचवताना माझ्या शहीद झालेल्या मित्राच्या चेहऱ्यावर समाधान होतं तो कर्तव्य बजावत गेला. त्या एका उत्तराने मला अंतर्मुख केलं. आज आपल्यासमोर जे पुरस्कार विजेते बसले आहेत, ते प्रत्येक जण त्या जवानासारखाच आहे समाजासाठी काम करताना त्यांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा केली नाही. त्यांनी काम केलं, कारण त्यांना ते योग्य वाटलं. शिक्षकांनी ज्ञान दिलं, पत्रकारांनी सत्य मांडलं, सामाजिक कार्यकर्त्यांनी माणुसकी पेरली, साहित्यिकांनी विचारांचे कंगोरे उलगडले, उद्योजकांनी नवसंजीवनी दिली आणि आदर्श शाळांनी भविष्य घडवलं. हे केवळ कार्य नाही, हे एक दैनंदिन तपस्येसारखं आहे. आज जेव्हा आपण यांना पुरस्कार देतो, तेव्हा खरं तर आपण समाजाचे ऋण फेडतो. हे पुरस्कार म्हणजे फक्त ट्रॉफ्या नाहीत, त्या म्हणजे एक साक्ष आहे की आपली माणसं चांगलं काम करत आहेत, आणि त्यांना आपली पाठींबा आहे. या पुरस्कारांनी एक संदेश द्यावा अशी माझी मनापासून इच्छा आहे की यश हे केवळ स्पर्धांमध्ये नाही, ते सेवेच्या भावनेत आहे. खरा आदर्श तोच जो स्वतःसाठी नाही, समाजासाठी जगतो. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राजकुमार वाघमारे, आत्माराम वाव्हळ यांनी केले. पद्मपाणिचे दिलीप तरकसे, सौ. सिंधु तरकसे, हौसराव पवार, गायकवाड, आत्माराम वाव्हळ आदींनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT